

# आग! आग!

**Author:** Aditi Ghosh
**Illustrator:** George Supreeth
**Translator:** Sayali Godse

PRATHAM BOOKS

वाचन पातळी ३



जेव्हा अॅना आपलं गोव्यातलं घर सोडून मुंबईला यायला निघाली, तेव्हा ती खूप उत्साहात होती. पण त्याचवेळी मनातून तिला थोडंसं उदाससुद्धा वाटत होतं. कारण तिचे काका, आजी, मित्रमैत्रिणी यांना सोडून तिला जावं लागणार होतं ना! आणि त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिचा लाडका 'मँडो' यापुढे तिला भेटणार नव्हता.

मँडो कुत्रा तसा स्वभावानं अगदी शांत होता. तो दिवसभर निवांत झोपा काढायचा. मात्र शेजारी कुठंही लग्नकार्य असलं, की मात्र तो अगदी वेड्यासारखा अखंड भुंकतच राहायचा. मुख्य म्हणजे जोवर अॅनाचे काका आपलं व्हायोलिन वाजवणं बंद करायचे नाहीत, तोवर तो आपलं भुंकणं अजिब्बात थांबवायचा नाही.

अॅनाचं मँडोवर अगदी जीवापाड प्रेम होतं. प्रत्येक गोष्टीपासून तो नेहमीच आपलं रक्षण करेल, हे तिला पक्कं ठाऊक होतं – अनोळखी लोकांपासून, कुठल्याही धोक्यापासून आणि मुख्य म्हणजे तिच्या काकांच्या कर्कश्श व्हायोलिनवादनापासूनसुद्धा!





मुंबई एक अतिशय गजबजलेलं शहर होतं. सगळीकडे खूप गोंगाट होता. पक्ष्यांचा किलबिलाट, चर्चचा घंटानाद आणि गावातल्या संगीताचे स्वर यांची अॅनाला खूपच आठवण येत होती. अर्थात एकाच गोष्टीची तिला अजिबात आठवण येत नव्हती... आणि ती म्हणजे काकांचं बेसूर व्हायोलिन!

कधी कधी शाळा सुटल्यानंतर अॅना आपल्या बाबांबरोबर पत्रं आणि पार्सलं यांचं वाटप करायला जात असे.



उंच इमारतीतल्या लिफ्टमधून प्रवास करण्याची ती आतुरतेनं वाट बघायची. एकदा तर तिनं जरा वात्रटपणा करत तिनं एका लिफ्टमधली सगळीच बटणं दाबून ठेवली. त्यामुळं प्रत्येकच मजल्यावर लिफ्टच्या दरवाजाची उघड-झाप व्हायला लागली.


तिथल्या प्रत्येक मजल्याच्या भिंतीवर एका लाल रंगाच्या बॉक्समध्ये स्पीकर बसवलेला होता. प्रत्येक मजल्याच्या छतावर शॉवरसारखी दिसणारी काही तरी विचित्र वस्तुसुद्धा बसवलेली होती.

“इथं उभं राहून आंघोळ करावी, असं कोणाला बरं वाटत असेल?” अॅना आश्चर्यचकित होऊन विचार करू लागली.



त्या सगळ्या अनोळखी गोष्टी नक्की कशासाठी असतील, याचा अॅना शोध घेऊ लागली. त्या लाल स्पीकर बॉक्समधून कधीही गाणी किंवा कसलंच संगीत ऐकू येत नसे.

आणि तो शॉवर? छे! एकदाही एक थेंबभरसुद्धा पाणी त्यातून आलेलं दिसलं नाही. शिवाय त्याला जोडलेला नळही तिथं कुठे नव्हताच.



एकदा दुपारी अॅना आणि तिचे बाबा पाचव्या मजल्यावर मंजूआजीच्या घरापाशी उभे होते. अचानक त्यांना किंचाळीसारखा वाटणार एक भयंकर आवाज ऐकू आला.

“बाबा, हा भयानक आवाज कसला आहे हो?”

“बापरे! फायर अलार्म वाजतो आहे बहुतेक. अॅना चल पटकन, आपल्याला इथल्या संकटकालीन दरवाज्यातून लगेच बाहेर पडलंच पाहिजे.”



अ◌ॅनानं बघितलं, तर बरेच लोक
तिथल्या एका सुरक्षित असणाऱ्या
ठिकाणापाशी गोळा झाले होते.

“घाबरू नकोस हं अ◌ॅना. दुसऱ्या
मजल्यावर एक छोटीशी आग
लागली आहे. तुला तो खालच्या
सायरनचा आवाज ऐकू येतोय ना?
तो आगीच्या बंबाचा आहे.
अग्निशामक दलाचे काका आपल्या
मदतीला आले आहेत.

तेवढ्यात त्या विचित्र शॉवरमधून
सगळीकडे पाण्याचे फवारे
उडायला सुरुवात झाली.



अरे बापरे! तिकडे त्या कोपऱ्यात कोण आहे? अरेच्चा, हे तर मंजूआजीचं मांजराचं पिल्लू! आग आणि पाणी यांमुळे ते अगदी भेदरून गेलं होतं.



भीतीनं थरथरत असलेल्या त्या पिल्लाला पाहून अ◌ॅनाच्या अंगात एकदम शौर्य संचारलं. ती त्याची सुटका करायला धावली.

आता तिला थोडा धीर आल्यानं तिनं बाबांना विचारलं, “त्या शॉवरमधून पाणी कसं काय आलं हो बाबा?”



“अॅना, त्या शॉवरना ‘फायर स्प्रिंकलर्स’ असं म्हणतात. आग लागली की ते आपोआप सुरू होतात.” बाबांनी माहिती दिली.

“पण त्यासाठी इथे नळ कुठाय बाबा? अॅनानं पुढचा प्रश्न विचारला. मग अॅनाचे बाबाही मान वर करून त्या स्प्रिंकलरकडे बघू लागले. या प्रश्नाचं नेमकं उत्तर खरंतर त्यांनाही ठाऊक नव्हतं.



“इथे पाण्याचा नळ नसतो अॅना,” मंजू आजीनं उत्तर दिलं. “तो लाल रंगाचा पाईप दिसतोय ना? तो कायम पाण्याने भरलेला असतो. त्याच्या वरती एक काचेचा गोळा घट्ट बसवलेला असतो. जवळपास कुठेही आग लागली, तर त्या उष्णतेमुळे गरम होऊन तो गोळा फुटतो. मग आपोआप शॉवरमधून पाण्याचे फवारे सुरू होतात.”

“अच्छा! असं आहे होय...” अॅनाचे बाबा म्हणाले. आज त्यांनाही एक नवीन गोष्ट शिकायला मिळाली होती.



“**बीप बीप बीप बीप....**

तेवढ्यात त्यांच्या पुढ्यात एक भलीमोठी पांढऱ्या रंगाची शिडी येऊन थांबली.

“कृपया लहान मुलं आणि वयस्कर लोकांनी आधी पुढे यावं,” अग्निशामक दलाचे काका खाली उभे राहून भोंग्यातून सूचना देत होते.

त्या अग्निशामक दलाच्या शिडीवरच्या पाळण्यामध्ये जाऊन उभं राहिल्यावर मंजूआजीनं अॅनाचा हात घट्ट धरला आणि भीतीनं आपले डोळे गच्च मिटून घेतले. अॅना मात्र विस्फारलेल्या डोळ्यांनी सगळीकडे बघत होती.

अॅना, आज तू खरंच खूप शूरपणे वागलीस," तिचे बाबा अभिमानानं म्हणाले. "त्या फायर अलार्मचा आवाज ऐकून तुला भीती वाटली का गं?"

मग अॅनानं त्यांच्या पोटाला घट्ट मिठी मारली आणि होकारार्थी मान डोलावली.

"आज त्या फायर अलार्ममुळे आपण सगळेजण सुखरूप वाचलो. किती उपयुक्त गोष्ट आहे ना ती", बाबा हळुवार आवाजात म्हणाले.

"हे तर आपल्या मँडो कुत्र्यासारखंच झालं की मग," अॅना कुजबुजत त्यांना म्हणाली. तिचे बाबा जरा बुचकळ्यातच पडले.

"म्हणजे हा फायर अलार्म दररोज एकदम शांत असतो. पण जेव्हा आपल्याला संकटातून वाचवायचं असेल, तेव्हाच तो खूप आवाज करतो."

तंत्रज्ञानाचा आपल्याला अनेक प्रकारे उपयोग होतो. शाळा, सिनेमागृहं आणि अन्य इमारतींमध्ये आग लागल्यावर आपोआप कार्यरत होणारी स्वयंचलित यंत्रणा आपला जीव वाचवते.

जेव्हा आपल्याला फायर अलार्म ऐकू येईल, तेव्हा आपण काय करायला हवं, याबद्दलच्या काही सूचना:
१. गडबड गोंधळ न करता शांतपणे एका रांग करून आपल्या नजीकच्या आपत्कालीन दरवाज्यापाशी जा. कधीही लिफ्टचा वापर करू नका. कारण आग लागली की बहुतेक वेळा लिफ्ट बंद पडते.



२. धावल्यामुळे तुमच्या शरीरात जास्त प्रमाणात श्वासातून धूर शोषला जातो. शिवाय धावपळीमुळे अपघात किंवा चेंगराचेंगरी होण्याचीही शक्यता असते. त्यामुळं धावू नका, भरभर चाला. शक्य असल्यास एखादा टॉवेल ओला करून तो तोंडाभोवती गुंडाळून घ्या.

३. आगीवर पाण्याचा मारा करू नका. त्यामुळे आग पसरण्याची किंवा विजेचा झटका बसण्याची शक्यता असते.

४. मोठ्या माणसांना विजेचा मुख्य स्विच बंद करायला सांगा. कोणत्याही प्रकारच्या विजेच्या उपकरणांना किंवा बटणांना हात लावू नका.

५. जर बाहेर पडण्याच्या मार्गावर खूप धूर जमा झालेला असेल, तर तिथून रांगत किंवा सरपटत बाहेर पडा. यामुळं नाकातोंडात धूर जाण्याचं प्रमाण खूप कमी होतं.

६. इमारतीच्या बाहेर पडताच तिथून सगळ्यात जवळ असलेल्या मोकळ्या पटांगणात किंवा जमा होण्यासाठीच्या अन्य सुरक्षित ठिकाणी पोचा.

७. तुमचे कुटुंबीय किंवा तुमची देखभाल करणाऱ्या प्रौढ व्यक्ती जोवर तुमच्यापाशी येत नाहीत, तोवर एकाच ठिकाणी थांबून राहा.

८. जर तुम्ही जखमी झाला असलात, तर नजीक असणाऱ्या प्रौढ व्यक्तीकडे मदत मागा.

PRATHAM BOOKS storyweaver

This book was made possible by Pratham Books' StoryWeaver platform. Content under Creative Commons licenses can be downloaded, translated and can even be used to create new stories - provided you give appropriate credit, and indicate if changes were made. To know more about this, and the full terms of use and attribution, please visit the following link.

## Story Attribution:

This story: आग! आग! is translated by Sayali Godse . The © for this translation lies with Pratham Books, 2018. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Based on Original story: 'Fire! Fire!', by Aditi Ghosh . © Pratham Books , 2018. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license.

## Other Credits:

Fire! Fire!' has been published on StoryWeaver by Pratham Books. The development of this story has been supported by CISCO. www.prathambooks.org

## Images Attributions:

Cover page: Girl holding a fire hose, by George Supreeth © Pratham Books, 2018. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 2: Girl petting a dog on a verandah, by George Supreeth © Pratham Books, 2018. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 3: A girl and a dog, by George Supreeth © Pratham Books, 2018. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 4: Girl talking to a policeman and postman, by George Supreeth © Pratham Books, 2018. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 5: Girl getting into a lift, by George Supreeth © Pratham Books, 2018. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 6: Girl talking about a shower, by George Supreeth © Pratham Books, 2018. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 7: Girl and postman delivering mail, by George Supreeth © Pratham Books, 2018. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 8: Fire sprinkler going off, by George Supreeth © Pratham Books, 2018. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 9: Man putting out a fire, by George Supreeth © Pratham Books, 2018. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 10: Girl and lady worried, by George Supreeth © Pratham Books, 2018. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license.

Disclaimer: https://www.storyweaver.org.in/terms_and_conditions

CC BY

Some rights reserved. This book is CC-BY-4.0 licensed. You can copy, modify, distribute and perform the work, even for commercial purposes, all without asking permission. For full terms of use and attribution, http://creativecommons.org/licenses/by/4.0/

CISCO. A Corporate Social Responsibility Initiative

The development of this story has been supported by CISCO.

PRATHAM BOOKS storyweaver

This book was made possible by Pratham Books' StoryWeaver platform. Content under Creative Commons licenses can be downloaded, translated and can even be used to create new stories - provided you give appropriate credit, and indicate if changes were made. To know more about this, and the full terms of use and attribution, please visit the following link.

## Images Attributions:

Page 11: Girl and lady petting a cat, by George Supreeth © Pratham Books, 2018. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 12: Lady talking about fire sprinklers, by George Supreeth © Pratham Books, 2018. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 13: Firefighters excavating a building, by George Supreeth © Pratham Books, 2018. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 14: Beige, by George Supreeth © Pratham Books, 2018. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 16: Child holding a fir hose, by George Supreeth © Pratham Books, 2018. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license.

Disclaimer: https://www.storyweaver.org.in/terms_and_conditions

Some rights reserved. This book is CC-BY-4.0 licensed. You can copy, modify, distribute and perform the work, even for commercial purposes, all without asking permission. For full terms of use and attribution, http://creativecommons.org/licenses/by/4.0/

CISCO. A Corporate Social Responsibility Initiative

The development of this story has been supported by CISCO.

# आग! आग!

(Marathi)

अॅनाला गोव्याची खूप आठवण येत असली, तरी तिला मुंबईतलं नवं घरही आवडू लागलेलं आहे. सारखी गजबज-गोंगाट असलेल्या मुंबानगरीत सगळ्या गोष्टी किती वेगळ्या वाटत असतात ना! काही उंच इमारतींमध्ये तिला स्पीकर्स आणि शॉवर्स बसवलेले दिसतात. विचित्रच ना? एरवी ते कधी सुरू असलेलेही दिसत नाहीत, पण एकदा काय झालं...

या पुस्तकाची वाचन पातळी ३ आहे. आपले आपण वाचू शकणाऱ्या मुलांसाठी.

PRATHAM BOOKS
storyweaver

Pratham Books goes digital to weave a whole new chapter in the realm of multilingual children's stories. Knitting together children, authors, illustrators and publishers. Folding in teachers, and translators. To create a rich fabric of openly licensed multilingual stories for the children of India and the world. Our unique online platform, StoryWeaver, is a playground where children, parents, teachers and librarians can get creative. Come, start weaving today, and help us get a book in every child's hand!